# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/०६/२०२६ (गुरूवार )

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा बंदोबस्त यशस्वीरित्या पार पडला ; मा. पोलीस अधीक्षकांनी मतदान केंद्रांना दिली भेट

आज दिनांक १८/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी सकाळी ०८:०० ते सायंकाळी ०४:०० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडली. नागपूर ग्रामीण जिल्हा हद्दीतील १) तहसील कार्यालय, नरखेड, २) तहसील कार्यालय, काटोल, ३) तहसील कार्यालय कळमेश्वर, ४) तहसील कार्यालय, सावनेर, ५) तहसील कार्यालय, पारशिवनी, ६) नगर परिषद कार्यालय, कन्हान—पिपरी, ७) तहसील कार्यालय, रामटेक, ८) तहसील कार्यालय, मौदा, ९) नगर परिषद कार्यालय, बुटीबोरी आणि १०) तहसील कार्यालय, उमरेड अशा एकूण १० मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडली.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान प्रक्रिया शांततापूर्ण व सुरळीत वातावरणात पार पडण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जिल्हा विशेष शाखा, नागपूर ग्रामीण तसेच सर्व पोलीस स्टेशनमार्फत योग्य बंदोबस्त नियोजित करण्यात आला होता. बूथ बंदोबस्त, पेट्रोलिंग बंदोबस्त, स्ट्रायकिंग बंदोबस्त, सर्व्हेलन्स व्हॅन बंदोबस्त तसेच राखीव बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

सदर मतदान प्रक्रियेदरम्यान मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी सावनेर व काटोल येथील मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान प्रक्रियेची तसेच बंदोबस्ताची पाहणी केली. यावेळी त्यांनी मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था, बंदोबस्ताची अंमलबजावणी तसेच उपलब्ध सुविधांची माहिती घेतली. तसेच नियुक्त पोलीस अधिकारी व अंमलदारांना सतर्क राहून कर्तव्य बजावण्याच्या सूचना दिल्या.

सदर बंदोबस्तात उपविभागीय पोलीस अधिकारी, बंदोबस्तासाठी नियुक्त पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच दंगा नियंत्रण पथक यांनी नेमून दिलेली कर्तव्ये काटेकोरपणे पार पाडली. जिल्हयातील मतदान प्रक्रियेचा संपूर्ण बंदोबस्त अत्यंत शांततेत व यशस्वीरित्या पार पडला.

बंदोबस्तात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या सहभागी असलेल्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांचे मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी अभिनंदन केले.




U ARE UNDER [redacted]-CAMERA /
[redacted] SURVIELLANCE"
O ONE SHALL CARRY MOBILE/
ERA/ TAB/ ELECTRONIC DEVICES
AND PEN OF ANY KIND
ISIDE THE POLLING STATION.
E OF VIOLATION, ACTIONS UNDER
SECTION 223 OF BNS
SHALL BE TAKEN"



# चोरीचे १३ गुन्हे उघड, १ आरोपी अटक, ११६.४४ ग्रॅम सोन्यासह ५० हजार रोख रक्कमेसह एकुण १२ लाख १४ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १८/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १३ चोरीच्या गुन्हयाची उकल केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे पथक उघड न झालेल्या गुन्ह्यांचा समांतर तपास करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण तसेच गुप्त बातमीदारांकडून प्राप्त माहितीच्या आधारे तपास केला. तपासादरम्यान नागपूर ग्रामीण जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन हद्दींमध्ये गर्दीची ठिकाणे, बसस्थानके, आठवडी बाजार, लग्नसमारंभ तसेच सण—उत्सवांच्या काळात गर्दीचा फायदा घेऊन महिलांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी करणारी टोळी निष्पन्न करत एका महीला आरोपीला ताब्यात घेतले. नमुद आरोपी हीच्या कडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता तिने तिच्या साथीदारासह केलेल्या १३ चोरीच्या गुन्हयांची माहीती दिली.

**पोलीसांनी नमुद आरोपीकडुन सोन्याची लगड एकूण वजन ११६.४४ ग्रॅम किंमती ११,६४,४००/— आणि ५०,०००/— रूपये रोख रक्कम असा एकुण १२,१४,४०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**उघड झालेले गुन्हे**

**१) पोस्टे सावनेर अप.क्रमांक ६१०/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**२) पोस्टे सावनेर अप.क्रमांक २१७/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**३) पोस्टे कळमेश्वर अप.क्रमांक ५०४/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**४) पोस्टे कळमेश्वर अप.क्रमांक ४९६/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**५) पोस्टे परमेश्वर अप.क्रमांक ४२५/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**६) पोस्टे खापा अप.क्रमांक ३१०/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**७) पोस्टे काटोल अप.क्रमांक ६१९/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**८) पोस्टे जलालखेडा अप.क्रमांक २३४/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**९) पोस्टे पारशिवनी अप.क्रमांक १९६/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**१०) पोस्टे रामटेक अप.क्रमांक ३४/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**११) पोस्टे रामटेक अप क्रमांक ४२८/ २०२६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**१२) पोस्टे पाचगाव अप क्रमांक १३/२६ कलम ३०३ (२) भान्यासं**

**१३) पोस्टे उमरेड अप क्रमांक ३५२/२६ कलम ३०३ (२) भान्यासं**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०६ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक १६/०६/२०२६ रोजी देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा वरघाट नाला येथे अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस वरघाट नाल्याकडे जात असतांना संशयित ट्रॅक्टर क्र. एम एच ४०/सि एक्स ३९६१ व विनाक्रमांकाची ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक १) रोशन मनोज कोरचे, वय २२ वर्ष, रा. रोंघा, ता. तुमसर, जि. भंडारा हा मिळुन आला. आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. मालकाबाबत विचारपुस केली असता मालक नामे संजय उर्फ भोज्या लेकचंद बावीसताले, रा. वरघाट, ता. रामटेक याचे सांगणेवरून रेतीचे उत्खनन करूप चोरटी वाहतूक करीत असल्याचे सांगितले.

**पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर क्र. एम एच ४०/सि एक्स ३९६१ किंमती ५,००,०००/—रूपये आणि विनाक्रमांकाची ट्रॉली किंमती १,५०,०००/— रूपये, ०१ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये असा एकुण किंमती ६,५५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम ३०३(२), ४९ भा. न्या.सं २०२३, ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खानी आणि नियमन अधिनियम १९५७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध , सावनेर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन सावनेर येथे दिनांक २३/०५/२०२६ रोजी अप क्र ५५४/२०२६ कलम १३७ (२),६४ भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलगी, वय १६ वर्षे हीचा शोध लागत नव्हता. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री सागर खर्डे,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी,सावनेर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक दिपक निंबाळकर आणि पथक यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक १७/०६/२०२६ रोजी गोपनिय माहीती आणि तांत्रिक माहीतच्या आधारे नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी ही आदिलाबाद राज्य तेलंगणा येथे असल्याची खात्रीशिर माहीती प्राप्त केली. सदर मुलीस ताब्यात घेवुन तिच्या आई—वडिलांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर मुलीला फुस लावुन पळवुन नेणाऱ्या आरोपीविरूध्द लैंगिक अपराधांपासुन बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये कलम वाढ करण्यात आले असुन आरोपी नामे राहुल संतोष मानकर, वय २१ वर्षे, रा भाग्यनगर, ताटीगुडा आदीलाबाद राज्य तेलंगणा याला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहेत.

# अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे दिनांक १८/०३/२०२५ रोजी अप क्र ३६३/२०२५ कलम १३७ (२), १४३ भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलगी, वय १६ वर्षे हीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण, पोउपनि श्री मंगेश वानखडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोलीस अंमलदार पन्नालाल बटाउवाले, पोलीस अंमलदार भाग्यश्री राउत, सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक १७/०६/२०२६ रोजी गोपनिय माहीती आणि तांत्रिक माहीतच्या आधारे नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी ही मौजा आवा, ता. लांजी, जि. बालाघाट, राज्य मध्य प्रदेश येथे असल्याची खात्रीशिर माहीती प्राप्त केली. सदर मुलीस ताब्यात घेवुन तिच्या आई—वडिलांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास बुटीबोरी पोलीस करीत आहेत.

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध , बुटीबोरी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे दिनांक १९/१२/२०२५ रोजी अप क्र ११९८/२०२५ कलम १३७ (२) भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलगी, वय १७ वर्षे हीचा शोध लागत नव्हता. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री निशांत मेश्राम, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बुटीबोरी यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक मनोज टिपले आणि पथक यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक १७/०६/२०२६ रोजी गोपनिय माहीती आणि तांत्रिक माहीतच्या आधारे नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी ही हैद्राबाद राज्य तेलंगणा येथे असल्याची खात्रीशिर माहीती प्राप्त केली. सदर मुलीस ताब्यात घेवुन तिच्या आई—वडिलांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास बुटीबोरी पोलीस करीत आहेत.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०९ गुन्हे नोंद

दिनांक १७/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, देशी दारू, विदेशी दारू असा एकुण ६२,२६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे सुनिल गजानन हेडावु, वय २७ वर्ष, रा. तिन देवुळ जवळ, हिगणघाट ता. हिगणघाट, जि. वर्धा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे** आरोपी नामे सलीम रहमान शहा, वय ६० वर्ष, रा. कोदेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे प्रितम भैयालाल हजारे, वय ६७ वर्ष, रा. वार्ड क्र. ११, नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा येथे आरोपी**

दशरथ किसन कुभले, रा. भुगाव, ता. कामठी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी येथे** आरोपी १) नागसेन गुरूदेव चव्हान, वय ५९ वर्ष, रा. इंदीरा नगर तामसवाडी, ता. पारशिवनी, जि. नागपूर २) रजत सुर्यवंषी, रा. खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपुर यांचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे सुनिल फत्तुजी लसुनते, वय ३८ वर्षे, रा. आदीवासी नगर, निमखेडा यांचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक येथे आरोपी १)** आशिष अशोक रामेलवार, वय ३७ वर्ष, रा नगरधन २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी येथे** आरोपी महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण ३५४६० मिली देशी दारू, ६८४० मिली विदेशी दारू, २० लिटर मोहाफुल दारू, १००० लिटर मोहाफुल सडवा, वाहन असा एकुण ६२,२६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने